**हसवणूक**





# रविवारची सकाळ

**(पु.लं. ची नाही, माझी)**

**♦ मेघना जोगळेकर**

रविवारची सकाळ. आमचा हा (हल्ली कोणी हे म्हणत नाही) दर रविवारी जातो तसा चेंडूची टोलवाटोलवी करायला गेलेला. बाकी मी बघितलंय की जगातल्या सगळ्या पुरुष जमातीला आपल्यासारखं उत्तम क्रिकेट दुसऱ्या कोणालाही खेळता येत नाही आणि खेळता येत असेल तरी आपल्याएवढं त्याला समजत नाही असं वाटत असतं. मग जसा देश बदलेल तसं खेळाचं नाव वेगळं नि तपशील वेगळा. पण तरी मी सांगत होतोच्या थाटात झालेली स्वगतं तीच. असो.

तर आपल्या गोष्टीची बालनायिका म्हणजे आमची चिऊ. सकाळी ७ च्या ठोक्याला उठून बसली होती. चिऊ म्हणजे आमची कन्यका. वय वर्षे चार. पण तिच्या मते, ती १०० इयर्स ओल्ड आहे. शाळेत नवीनच १०० शिकवल्याचा हा परिणाम. तिला वाटतं, गणितातला सगळ्यात मोठा नंबर म्हणजे १००. तर चिऊ सकाळीच उठलेली होती. त्याचं काय आहे की चिऊ 'झोपला तो संपला' किंवा 'झालंच तर झोपेल तो गरजेल काय' यात बिलिव्ह करते. उद्या जर तिने झोपेवर मात कशी कराल वगैरे प्रबंध लिहिला तर आश्चर्य वाटायला नको.

चिऊ नेहमीप्रमाणे भक्तिभावाने टी.व्ही.वरचा प्रोग्राम बघत होती. आपण जर पापणी हलवली तर उगाच त्या टी.व्ही.वरच्या कलाकाराला वाईट वाटेल म्हणून ती टक लावून कुठलाही प्रोग्राम बघते. आज मात्र स्वारी जरा कंटाळल्यासारखी वाटली. टी.व्ही. समोरून उठून चक्क किचनमध्ये घुसली. "आई, तू काय करतेस?" तिचा प्रश्न. माझीपण आज अगदी धांदल उडालेली होती. हा यायच्या आत मला माझा पुरणपोळीचा प्रयोग यशस्वी करून दाखवायचा होता. होळीच्या वेळचा साफ म्हणजे साफच फसला होता. आधी पुरण रुसलं होतं. मग पोळीही भडकली होती. त्यामुळे आज माझी ही घाई चाललेली. म्हटलं, "मी ना पुरणपोळी करतीय."

"का?" हा तर महतप्रश्न. सगळ्या उत्तरांच्यानंतर यावाच लागतो. चिऊही सोडत नाही.

"असंच. मागे एकदा केली होती बघ तशी."

"म्हणजे बाबा म्हणाला पोळीचा पापड खाती का?"

या गधडीची स्मरणशक्ती नको तेव्हा साथ देते. "हो, पण मी आज मऊ करणार आहे."

"मला पण बघायचंय."

मी चिऊला नेहमीसारखं फ्लॅटफॉर्मवर चढवून बसवलं. पण एकाजागी बसून आपल्या आईचे उद्योग बघेल ती चिऊ कसली? तिने आजूबाजूला ज्या ज्या गोष्टींना आपला हात किंवा पाय सहज लागणार नाही त्या सगळ्या गोष्टींना तिच्या भाषेत रेच करायला सुरुवात केली. सोबतीला तिचा चॅटरबॉक्स आणि माझा ॲन्टी चॅटरबॉक्स सतत चालू. आधीच माझ्यापाशी वेळ कमी त्यात चिऊचा गोंधळ. शेवटी न राहवून मी ओरडले.

"चिऊ, माझी कामं वाढवू नकोस. एका जागी गप्प बसून रहा बघू. नाहीतर टाइमआऊट देईन. अजून सगळा धोबीघाट वाट बघतोय. एकदा ऑफिस चालू झालं की आठवडाभर कपडे वाट बघत बसतील कधी येणार आमचा धोबी? कधी येणार?"

चिऊने माझी नाट्यछटा मध्येच तोडत विचारलं, "आई, तुझं ऑफिस कुठं आहे?"

"गोल्डन गेटवर" मी म्हटलं.

भारतातून येणाऱ्या–जाणाऱ्या नातेवाईकांबरोबर गोल्डन गेटच्या वाऱ्या केल्यामुळे आमच्याकडे गोल्डन गेटचे दोन मनोरे आहेत. कधी एक मनोरा ढगात तर कधी दोन्ही. त्यांच्या पार्श्वभूमीवर आम्हा सगळ्यांची पारम्युटेशन्स कॉम्बीनेशन्स असे असंख्य फोटो आहेत. त्यामुळे चिऊला गोल्डन गेट चांगलाच माहीत झालेला आहे.

"म्हणजे गोल्डन गेटच्या टॉपवर..?" डोळे मोठे करत चिऊनं विचारलं.

"च..च.. नाही ग. त्याच्या बाजूला. टॉपवर कसं असेल ऑफिस?"

"इंडियात की अमेरिकेत?"

चिऊला भारत ओशनच्या त्या साइडला आहे असे सांगितल्यामुळे गोल्डन गेट क्रॉस करून गेलं की भारत येतो असं वाटलं. मलाही आज प्रथमच हे कळत होतं.

"नाही ग चिमणे, अमेरिकेतच आहे."

तिच्या प्रश्नांचा भडिमार रोखायला मी विषय बदलला.

"चिऊ, तुला माहितीय का भारतात पुरणपोळी कधी करतात ते? होळीला आणि माहितीय का आम्ही बिल्डिंगमधले सगळे लोक मिळून मोठी होळी पेटवतो."

"होली?" (अजून 'ळ' साठी जीभ वळत नाही. जिथे बाकीचं वळण नाही तिथे जिभेने तरी का वळायचं – इति आमच्या मातोश्री.)

"हो होळी. म्हणजे आम्ही असा खोल खड्डा खणून (प्रात्यक्षिक म्हणून कणकेत एक खोल खड्डासुद्धा केला) त्यामध्ये होळी पेटवतो आणि बोंबसुद्धा मारतो."

"मी मारते तशी? मग तू का मला ओरडतेस?"

"अग, हे फक्त होळीला चालते. आणि माहितीय का काय मज्जा असते ती. आम्ही पाण्याने भरलेले फुगे एकमेकांवर फेकतो. रस्त्यावरच्या लोकांनापण सोडत नाही. त्यांच्यावरही पाणी उडवतो. एवढी मज्जा येते ना!"

चिऊ माझ्या टकळीला कंटाळली बहुतेक. आईपेक्षा टी.व्ही. बरा वाटून म्हणाली, "आई, मला टी.व्ही. बघायचाय."

म्हटलं जातेस तर जा बाई. मलाही जरा बरं. मी आपली लहानपणच्या आठवणी काढत पोळ्या करत बसले. समोरच्या खिडकीतून माणसं कधी आली, कधी गेली बघायचा मला हल्ली छंदच जडलाय. तेवढ्यात शेजारचा जॉन निकीला कडेवर घेऊन चाललेला दिसला. चालता चालता सारखा काही झाडत होता. म्हटलं, निकीबाईचं पॉटीट्रेनिंग चालू झालं वाटतं. मला आठवलं, एकदा चिऊला त्यांच्याकडे ठेवलं होतं ती गोष्ट. त्या पंधरा मिनिटांमध्ये त्यांच्या घरात केवढा थैमान. चिऊने वॉटर... म्हणत त्यांच्या पूलमध्ये उडी टाकून निकीच्या आईला घेरी आणली. तशी आमची चिऊ शेजाऱ्यांमध्ये चांगलीच प्रसिद्ध आहे.

एकदा समोरच्या अय्यरच्या हाऊसवॉर्मिंगला चिऊने त्यांच्या सगळ्या नवीन फर्निचरवर चढून उड्या मारायचा नुसता सपाटा लावला होता. आता अय्यर उठून तांडव करेल की काय अशी आम्हाला सारखी भीती. तो कथकली का काय म्हणतात ते शिकला होता म्हणे. पण तसं काही झालं नाही.

एकदा सगळी मुलं प्रिटेंडिंगचा खेळ खेळत होती. आमच्या चिऊनं डॉग व्हायचं ठरवलं. बाकीच्या मुली सिंड्रेला नाहीतर स्नोव्हाईटसाठी भांडत होत्या. पण आमच्या चिऊने कुत्रंच व्हायचं ठरवलं. झाली तर झाली वर आपल्या श्वानधर्माला जागून त्या स्नोव्हाईटला चावली. का तर म्हणे तिने हिची ती खोटी इमॅजिनरी शेपटी ओढली म्हणून. सगळे शेजारी 'न भूतो न भविष्यती' अशी ईस्ट–वेस्टची एकी करून आम्हाला लवकरच छू करणार की काय असा आम्हाला दाट संशय आला.

एक एक प्रसंग आठवताना आणि समोरच्या माणसांना बघताना माझी चांगलीच करमणूक होत होती. पण बघते तर जो येतोय त्याची कधी पॅन्ट ओली तर कधी शर्ट ओला झालेला. येणारा सारखा वर बघे. म्हटलं पाऊस तर नाही ना पडत. मग या सगळ्या प्रवाशांना एकदमच लघुशंका येतीय की काय? माझ्या विनोदावर मीच हसत तव्यावरची शेवटची पोळी एकदम स्टाईलमध्ये डब्यात टाकली आणि माझा सूर्या बल्ब खाडकन पेटला.

जिन्यात जाऊन कडाडले, "चिऊ काय चाललंय तुझं? आधी खाली ये."

चिंब भिजलेली चिऊ हिमॅनच्या थाटात वॉटरगन घेऊन जिन्यात उभी होती. "आई, मी ना होली खेळतीय. इटस सो मच फन. तू पण ये."

तिच्या त्या उत्तराने माझे डोळे लकाकले. मलाही लोकांवर पाणी उडवायचा मोह आवरेना. म्हटलं, "चल मीपण येते."

नंतर मी तिला वॉटरगन भरून देत होते आणि ती पाणी उडवत होती. आधी एकमेकींना आणि मग येणाऱ्या–जाणाऱ्यांवर असं चालू होतं. खरं सांगायचं तर अमेरिकेत आल्यापासून प्रथमच मी इतकं एन्जॉय करत होते. हिंदी सिनेमासारखं डोकं बाजूला ठेवून चिऊमध्ये मला जणू माझंच बालपण सापडलं होतं. मागं काय काय आणि किती सोडून आलोय याचा विचार आला आणि वाटलं यात नुसती आपल्या मातीची आठवणच नसते तर त्यात गंध मिसळलेलं आपलं बालपणही असतं.

"आई, मी बघं कॉपवर पाणी उडवलं."

"काय?"

खिडकीतून खाली वाकून बघते तर आमचा सिक्युरिटी गार्ड. पटकन कपडे बदलून खाली गेले. त्याची कशीबशी बोळवण केली. चिऊचेदेखील कपडे बदलले. म्हणते कशी, "आई, आय लव्ह धिस गेम. लेटस प्ले इट अगेन टुमारो."

मी म्हटलं, "पुढचं पुढं बघू. बट डोन्ट प्ले इट अगेन विदाआऊट मी. लेटस कीप इट अवर सिक्रेट."

चिऊला हा प्लॅन फारच आवडला. एव्हाना दुपार झाली होती. हाही आला. त्याला 'ॲडव्हेंचर्स ऑफ चिऊ ॲन्ड आई' हा भाग आईचा पार्ट गाळून सांगितला.

दुसऱ्या दिवशी उठून बघते तर दाराबाहेर कुणा चहाटळाने बोर्ड आणून लावला होता, 'बीवेअर ऑफ चिऊ!'

♦

**मेघना जोगळेकर**